# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१** **दि. १८ मे, २०२१**

**(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)**

जळगाव दि.१८ ( ): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्याच्या ऑनलाईन परीक्षांना मंगळवार दि. १८ मे पासून सुरळीत प्रारंभ झाला.

विद्यापीठाच्या एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एम.एस.डब्ल्यू., एम.ए.(एम.सी.जे.), एम.बी.ए., एम.एम.एस. (कॉम्प्युटर मॅनेजमेंट), एम.सी.ए., एम.सी.ए. इंटीग्रेटेड पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रथम सत्रास प्रवेशित नियमित विद्यार्थ्यांच्या आणि प्रथम वर्ष इंजिनियरींग सत्र १, व्दितीयवर्ष इंजिनियरींग सत्र ३, बी.फार्मसीचे सत्र १ आणि ३ आणि विद्यापीठ प्रशाळातील पदव्युत्तर वर्गांच्या सत्र १ या सर्व अभ्यासक्रमांच्या लेखी परिक्षा ऑनलाईन पध्दतीने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरूपात घेण्यात येत आहे. मंगळवारी पहिल्या दिवशी ९,८४२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षेसाठी लॉगईन केलेल्या ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणी उद्भवल्या होत्या त्या आय.टी. समन्वयकांमार्फत दूर करण्यात आल्यात. त्यामुळे लॉगईन झालेला कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिला नाही. विद्यार्थ्यांना तीन तासांचा विंडो कालावधी दिला असल्यामुळे सोयीचे झाले. पदवीस्तरावरील परीक्षेसाठी ९० मिनीटे व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी १२० मिनीटांचा कालावधी देण्यात आला आहे. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर या परीक्षा ऑनलाईन घेण्यात येत आहेत. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक श्री. बी.पी. पाटील यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी